प्रकरण चौथे

# वाङ;मय समीक्षे विषयी वा. लं ची भूमिका

प्रकरण चौथे

# वाड;मयीन समीक्षेविषयीची वा. लं.ची भूमिका

'वाड;मयीन टीका' हा कधीही न संपणारा शोध आहे. टीका केली म्हणजे साहित्याचा शोध लागतोच असे नव्हे. समीक्षकाने कलाकृतींच्या चैतन्यतत्वांचा शोध घ्यावा. समीक्षेचे कार्य म्हणजे साहित्यकृतीत जीवनाच्या चैतन्यांशाचे दर्शन घडत असल्याने त्या चैतन्यशांचा शोध घेणे हे समीक्षेचे कार्य आहे. टीका लेखनामागील कुलकर्णी यांची भूमिका विशुद्ध कलावादी होती. टीका लेखनाच्या पद्धतीला संश्लेषणात्मक पद्धतीचे वळण देणारा टीकाकार म्हणून वा. ल. कुलकर्णी ओळखले जातात. साहित्य हे व्यक्तीमनाची निर्मिती असते. 'समीक्षा' ही एक शोधाची प्रक्रिया आहे. आणि तो शोध शोधकाच्या विनम्र परंतु जिज्ञासू बुद्धीने घेतला जावा ही वा. ल. कुलकर्णी यांची भूमिका आहे.

साहित्याच्या क्षेत्रामध्ये वा. ल. कुलकर्णी हे एक लेखक म्हणून ओळखण्यापेक्षा ते समीक्षक म्हणूनच ओळखले जातात. कारण वा. ल. कुलकर्णी यांनी अनेक पुस्तके लिहली ती सर्व पुस्तके 'समीक्षण' या विषयावरच आहेत.या पुस्तकांचे वाचन केल्यानंतर त्यांच्या वाचनाची व्याप्ती लक्षात येते. वाड;मय विषयक विचार, वाड;मयीन प्रश्न आणि त्यावरील समस्यांची सोडवणूक केलेली आढळते. विशिष्ट लेखक निवडूण त्यांच्या समीक्षणात्मक लेखनाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी समीक्षणात्मक लेखन करताना ललित लेखकाच्या मनस्थीतीचाही विचार केलेला आहे. उदा.- श्रीपादकृष्ण वाड;मयदर्शन नाटककार खाडिलकर., एक अभ्यास, न. चि. केळकर वाड;मय दर्शन, हरिभाऊंची सामाजिक कादंबरी हरिभाऊंच्या कादंबरीतील व्यक्ती, अशा प्रकारची समीक्षा ही वा. ल. नी केलेली आढळते.

कुलकर्णी यांची समीक्षात्मक पुस्तके म्हणजे 'साहित्य स्वरुप आणि समीक्षा ' वाड;मयातील वादस्थळे. वाड;मयीन मते आणि मतभेद, वाड;मयीन टीपा आणि टीप्पणी, वाड;मयीन दृष्टी आणि दृष्टीकोण, मराठी ज्ञानप्रसारक, इतिहास व वाड;मय विचार, साहित्य शोध आणि बोध, मराठी नाटक आणि रंगभूमी काव्यातील दुर्बोधता, अशा प्रकारची समीक्षात्मक पुस्तके वा. ल. कुलकर्णी यांनी लिहिली. वरील सर्व पुस्तके माझ्या वाचनांत आली. तेव्हा ते लेखन वाचल्यानंतर एका उत्तम समीक्षकाचे गुण वा. ल च्या लेखनांत आढळून आले. मुख्य म्हणजे समीक्षक म्हणून घेण्यासाठी वा. ल. हे पात्र होते. वाड;मयविषयक विचार मांडून ते वाड;मयविषयक ज्ञानांमध्ये भर घालण्याचे काम वा. ल. कुलकर्णी करतात. कुलकर्णी यांचे समीक्षेविषयीचे विचार प्रामुख्याने त्यांच्या ललित वाड;मयाकडे पाहण्याच्या दृष्टीकोणातूनच जन्माला आलेले आहेत. त्यांनी सर्व वाड;मयप्रकारांची समीक्षा केली. नाट्य समीक्षा, कादंबरी कथा यावरील समीक्षा त्यांच्या समीक्षकाविषयक पुस्तकांचे वाचन करताना त्यांच्या वाचनाची व्यापकता व अभ्यासाच्या सखोलतेचे दर्शन घडते. वा. ल. कुलकर्णी वाड;मयविषयक केवळ समस्या मांडून थांबलेले नाहीत. तर त्या समस्या मांडून त्या सोडविण्याचे उपायही ते सांगतात. निरनिराळ्या दृष्टीकोणांची जाणीव वाचकाला करुन देतात. आणि यापाठीमागे त्यांचा उद्देश म्हणजे वाड;मयाचा विकास व्हावा आणि वाड;मयातील दोष मुळापासून नाहीसे करुन वाड;मयाला

निर्दोष, शुद्ध करावे म्हणजे वाचकांना ते उपयोगी ठरेल.

मराठी नाटकाविषयी आपली समीक्षेची पद्धत मांडताना वा. ल. कुलकर्णी म्हणतात. एका वेळी एकाच वाड;मयीन किंवा कलाविषयक प्रश्नांचा वेगवेगळ्या दृष्टीकोणातून थोडी मोकळ्या मनाने चर्चा व्हावी. आणि तत्संबंधीच्या विचारांना चालना मिळावी. हा समीक्षण प्रकाशनाचा एकमेव उद्देश असतो. असे ते मानतात. एखादा जुना किंवा नवा लेखक एखाद्या कालखंडातील वाड;मय एखाद्या वाड;मयप्रकाराचे तात्विक स्वरुप किंवा त्या वाड;मयप्रकारातील लेखन एखाद्या वाड;मयविषयक किंवा कलाविषयक कूट प्रश्न इत्यादींच्या संबंधामध्ये थोडा मूलभूत विचार व्हावयाच्या दृष्टीने समीक्षेचे संपादन करावे. अशी कल्पना आहे हे सर्व प्रत्येक वेळी नियमित जमेलच अशी खात्री नसल्यामुळे 'समीक्षा' हे आज नियतकालिक बनू शकत नाही. वा. ल. कुलकर्णींनी समीक्षेची पुस्तके ही प्रत्येक वाड;मयअभ्यासकाला ग्राह्य वाटावी ह्याच हेतूने लिहली आहेत.

वाड;मयीन समीक्षेचे लेखन करताना कुलकर्णी हे कालखंडाचाही विचार करतात. वा. ल. हे स्वतःच्या लेखनातील अपुरेपणाची जाणीव करुन देतात. आणि कबूलीही देतात. त्यामुळे त्यांच्यातील उत्तम समीक्षकाचा गुणही दिसून येतो. प्रामाणिकपणे आपल्या अपूर्णतेची कबुली देणे.

वा. ल. कुलकर्णी यांनी केवळ आपल्या लेखनातूनच समीक्षा केली नाही. तर त्यांनी जेथे जेथे संधी मिळेल तेथे तेथे आपले विचार मांडायला सुरुवात केली. त्यातून त्यांची खरी तळमळ दिसून येते. आपल्या कार्यामध्ये त्यांनी कधीही खंड पडू दिला नाही.

हैदराबाद येथे १९६५ साली ते साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. हैदराबादकरांनी अध्यक्षस्थान वा. लं. ना बहाल केले. तेव्हा अध्यक्षपदाचे भाषण करताना त्यांनी त्या भाषणांमधून देखील आपले साहित्यविषयक विचार मांडून समीक्षेचा अर्थ सांगितला.

वा. ल. कुलकर्णी म्हणतात. साहित्याची ही प्रतिसृष्टी आईच्या कुशीतून मूल जन्माला यावे तसे साहित्य हे देखील जीवनातूनच जन्माला येत असूनही जीवनाहून अलग आहे. ते जणू समांतर आहे. साहित्याच्या ह्या कल्पसृष्टीमध्ये अवतरणारी प्रत्येक कृती एका अर्थाने सचेतनच असते. ती कृती एका जिवंत मनाचे सर्जन असल्यामुळे त्या मनाच्या अनुभूतीशी संलग्न असणारे चैतन्य तिच्या अभिव्यक्त रुपांतही अवतरण्याची धडपड करीत असते. जीवन व साहित्य यांच्या रहस्याचा शोध हा कधी न संपणारा शोध आहे. या सर्व गोष्टींचा विचार केल्यानंतर साहित्य समीक्षेने हे लक्षांत ठेवूनच पावले टाकावीत असे वा. ल. कुलकर्णी म्हणतात. मग ती साहित्य समीक्षा एका साहित्यकृतीची असो किंवा अनेक साहित्यकृतीना जन्म देणाऱ्या एका प्रतिभावान मनाची असो किंवा समग्र साहित्याची असो, संपूर्ण साहित्य सृष्टीची असो विविध मनांनी सर्जिलेल्या आणि साहित्यरुपाने अवतरलेल्या चैतन्याची ती समीक्षा आहे. ही गोष्ट समीक्षकाने कधीही विसरुन चालणार नाही. समीक्षेला वाटते आपण सर्व साहित्य व्यवहाराची व्यवस्था लावावी. तो व्यवहार नियमित करावा. त्यामध्ये सूत्रबद्धता आणावी. ह्याचे नियमन नेमके कोणत्या तत्वांनुसार होते. हे लक्षात घेऊन त्या तत्वांची अंमलबजावणी करावी. हे समीक्षेचे कार्य आहे. त्यालाच यांत्रिकता आणण्यास ही समीक्षा अजाणता जबाबदार ठरेल. समीक्षेची धडपड प्रत्येक साहित्यकृतीचे, साहित्यनिर्मितीच्या साहित्य प्रक्रियेचे आणि एकंदर साहित्यव्यवहाराचे रहस्य उलगडून दाखविण्यासाठी ह्या सर्वांचे मूल्यमापन करण्यासाठी

असते. समीक्षा ही धडपड प्रामाणिकपणे करीत असते. समीक्षेने शोधक बुद्धीची जपणूक केली पाहिजे. एखाद्या छोट्या मोठ्या कालखंडावर पसरलेल्या साहित्यव्यवहारांचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न करताना अनेकदा समीक्षा दिसते. येथे तिला या विविधरंगी, विविधढंगी, साहित्य व्यवहाराची व्यवस्था लावावयाची असते.

समीक्षेची मौज अशी आहे की, ती जेव्हा करायला बसते तेव्हा साहित्यकृती संबंधातील आशय, अभिव्यक्ती यांच्या अभिन्नत्वाबद्दल नि:शंक असते जेव्हा ती एखाद्या वाङ;मयप्रकारामध्ये झालेल्या विशिष्टकालिन लेखनाचा आलेख काढू लागते. तेव्हा तो मात्र त्या लेखनाला निमित्त झालेल्या समाजजीवनातील विविध घटनांचा व अवस्थांतरांचा बनतो. साहित्य हे प्रतिभावान मनांचे सर्जन, अनन्यसाधारण आहे ती कारागिरी नव्हे हेच नाकारणे होय. साहित्याच्या चैतन्यरुपाला ते बाधक आहे. साहित्यव्यवहाराबद्दल गैरसमज पसरविणारे आहे. साहित्य ही प्रतिभावान मनांनी बनलेली सचेतन वस्तू आहे. तिची निर्मिती प्रक्रिया ही खऱ्याखुऱ्या जिवंत वस्तूच्या सर्जनाची प्रक्रिया आहे. साहित्याकडून समीक्षेकडे येताना हा विषय अनुषंगाने आलेला आहे. साहित्य आणि जीवन यांचे अनोन्यसंबंध लक्षात घेत असता ज्या विचार सुत्रा आभावी मी पुढे सरकत गेलो. त्या विचार सुत्राची केवळ ही वैचारिक परिणती आहे. जीवनातून प्रतिक्षणी साकार होणाऱ्या साहित्य सृष्टीची सजीवता व ह्या सजीवतेमुळे तिच्यामध्ये अवतरणारे गुणधर्म हाच मुख्यत: माझ्या चिंतनाचा विषय आहे ह्या चिंतनात थोडाफार तथ्यांश असेल तर समीक्षेवरील जबाबदारी केवढी मोठी आहे. याची कल्पना यावी एवढांच हेतू आहे.

मराठी टीका ही इंग्रजी टीकेइतकी समृद्ध नाही. आजच्या कवितेतील संबधातील प्रश्नांचा आदर करणे हे टीकाकार, कवी आणि संपादक यांचे कर्तव्य आहे. सर्वच जबाबदाऱ्या टीकाकारांवर न टाकतां त्या जबाबदाऱ्या संपादक व टीकाकार यांनी उचलल्या आहेत.

वा. ल. कुलकर्णी हे समीक्षेविषयीचे लेखन करीत असताना 'समीक्षा' ही निरनिराळ्या कालखंडानुसार समीक्षेची रुपे बदलतात. वाचकांच्या मनामध्ये समीक्षेची गोडी निर्माण होऊन समीक्षेचा विकास होण्यासाठी त्यांनी काही उपाययोजना सांगितलेल्या आहे. समीक्षेची आवड निर्माण होण्यासाठी प्रथम कलाकृतीचे वाचन होणे हे अतिशय महत्वाचे आहे. विद्यार्थी हा शाळेत असतानाच कलाकृतीचा परिचय त्याला झाला पाहिजे. प्रत्येक विद्यापीठामध्ये साहित्यशाखेबरोबर साहित्याशी अगदी जवळचे नाते असलेल्या ह्या विविध ललितकलांच्या शाखा असणे कलासमीक्षा व साहित्याचा आस्वाद यांच्या हातात हात घालून फिरु लागल्यावाचून आपला साहित्य विचार खऱ्या अर्थाने प्रौढ होणार नाही. वा. ल. कुलकर्णी स्वत:ला साहित्याचा एक नम्र विद्यार्थी समजतात. संयोजक नव्हे मराठी साहित्याला मानाचे पान मिळवून देणे हे आपले स्वप्न आहे. हे स्वप्न साकार करण्यासाठी आपण झटले पाहिजे. कुलकर्णी यांना अभिजात वाङ;मयप्रवृत्तीचा शोध घेणारे समीक्षक म्हणून ओळखले जातात. त्यांनी आपल्या समीक्षेतून प्रामुख्याने समीक्षाविषयी प्रश्नांची चर्चा केली. त्यांच्या 'साहित्य आणि समीक्षा' या पुस्तकातून त्यांनी समीक्षाविषयक प्रश्नांची चर्चा केली. हे पुस्तक जेव्हा मी वाचले तेव्हा असे दिसून आले की, एवढ्या चोखंदळ दृष्टीने तीक्ष्ण दृष्टीने आपण जर साहित्याचे वाचन केले. एक समस्या वा. ल. नी मांडली ती म्हणजे वाङ;मयाचा आस्वाद निर्माण होतो. अशा प्रकारचे अडथळे वा. ल. नी काढून टाकण्याचे प्रयत्न केले आहेत. वा. ल. कुलकर्णींच्या

समीक्षेविषयीची मी जेव्हा सर्व पुस्तके वाचली तेव्हा एक गोष्ट मला जाणवली ती म्हणजे त्यांच्याकडे असणारी प्रमाणिकपणाची वृत्ती आपल्या झालेल्या अनेक चुका आपल्या लेखनातील अपूर्णत्वाची जाणीव त्यांना आहे. आणि त्या जाणिवेची कबुली ते देतात. आणि उत्तम समीक्षकांकडे असलेला गुण दिसून येतो. आणि मनाचे समाधान होते. अशाच एका चुकीबद्दल कबुली व्यक्त करताना ते म्हणतात, आपल्या 'वाड;मयीन मते आणि मतभेद' या पुस्तकातील एका लेखांत ते म्हणतात. माझ्या मतांचा अपुरेपणा दिसून आलेला असल्यामुळे कोणत्याही मताबद्दल दुराग्रह मी धरीत नाही. वाड;मयीन टीका हे वाड;मयीन सत्याचे संशोधन आहे. ह्या मताचा मी आहे हे संशोधन कार्य अखंड आहे त्याला अंत नाही.

टीकाकार हा आपले वाड;मयपरीक्षणात्मक लेख सर्व सामान्य वाचकांच्या हिताकरीता, उद्‌बोधनाकरीता त्यांना आपल्या वाचनांसाठी पुस्तके निवडण्यास सोयीचे जावे ह्या दृष्टीने लिहित असतो. काही परीक्षण लेख हे टीकाकारांच्या डोक्यावरून जातात. आणि सर्वसामान्य वाचकाला गोंधळात टाकतात. टीकाकारांचा व्यासंग अत्यंत खोल असेल व त्याची धारणशक्ती विशेष असेल तर त्याला त्याच्या समोरच्या ग्रंथात वाड;मयाच्या आगामी स्वरूपाची चिन्हे ही भावरूपाने दिसतात. तो त्याही गोष्टींचा उल्लेख आपल्या लेखांत केल्याशिवाय राहत नाही.

टीकाकाराच्या वाड;मयीन अभिरुचीला बालपणापासून सतत वाचनाने, मनाने व चर्चेने एक प्रकारचे वळण लागलेले असते. तो वाड;मय या विषयात प्रगल्भ झालेला असतो. व म्हणूनच तो जेव्हा लिहितो किंवा बोलतो तेव्हा लिहण्यात व बोलण्यात असा काही भाग असतोच की, जो ह्या सर्वसामान्य वाचकांच्या अवाक्याबाहेरचा आहे असाच अनुभव येतो. प्रशिक्षणकाराचा सल्ला मार्गदर्शक समजावा व त्याच्या शिफारशीनुसार वाचन करीत रहावे. वाचकानेच स्वत:च परीक्षणकार बनावे. समीक्षेबद्दल वा. ल. कुलकर्णी म्हणतात 'ऐकावे टीकाकारांचे आणि ठरवावे स्वत:चे टीकाकार' हे खरोखरच व्यासंगी, तज्ञ असतात. परंतु थोडेसे अहंभावाने पछाडलेले असतात. येन, केन प्रकारानेदेखील टीकाकार बनलेले असतात. नियतकालिकांच्या सृष्टीत असले उपटसुंभ बरेच असतात. वर्तमानपत्री व्यवसायात पडल्यामुळे इतर कामाप्रमाणे हेही काम त्यांच्याकडे आलेले असते. व इतर कामाप्रमाणे हेही काम ते स्वत:ला झेपेल तसे करीत असतात. परंतु आपण काय करतो याची दिक्कत त्यांना नसते. ते ज्या काळात लिहित असतात. त्या काळातील ललित वाड;मय त्यांनी व्यवसायपरत्वे घाईघाईने वाचलेले असते.काही टीकाकारांचे लेखन बिनबुडी व ठराविक साच्याचे असते. काही टीकाकारांचे वाड;मयविषयक लेखन असते तर काही टीकाकारांचे टीकाकारांनी केवळ टीका लिहून भागणार नाही तर वाड;मयीन शोधही लावला पाहिजे. असे वाड;मयीन समीक्षेविषयी कुलकर्णी आपले मत व्यक्त करतात.

वा. ल. कुलकर्णी एखाद्या पुस्तकाविषयीच्या परीक्षणाबद्दल लिहितात की, एखाद्या पुस्तकाचे परीक्षण म्हणजे त्या ग्रंथातील गुण दोषांचे जाहीर संकीर्णतच असते. मग ते सर्वसामान्य लेखकाना तरी कसे पसंत पडावे. व उपयुक्त ठरावे. परंतु ह्यांवर 'व्हर्जिनीया वुल्फ' या चतुर लेखिकेने थट्टेने एक चांगला उपाय सुचविलेला आहे. डॉक्टर वकील सल्ला देतात कायदा व वैद्यकीय व्यावसायिक आपली दुकाने उघडून बसतात. फी भरून सल्ले मिळवितात. त्याचप्रमाणे वाड;मयतज्ञानी आपली दुकाने उघडून बसावे व लेखकांनी फी तपासून घ्यावी. कुलकर्णी यांची १७ पुस्तके वाचल्यानंतर मला असे जाणवले की, या

पुस्तकाचे वाचन करीत असताना त्यांच्या समीक्षेच्या पध्दतीनुसार मला त्यातून त्यांची भूमिका लक्षात येते. त्यांची समीक्षणपर पुस्तके म्हणजे वामन मल्हार वाड;मय दर्शन, वाड;मयातील वादस्थळे, वाड;मयीन मते आणि मतभेद, वाड;मयीन टीपा आणि टीप्पणी, वाड;मयीन दृष्टी आणि दृष्टीकोण. श्रीपादकृष्ण वाड;मय दर्शन साहित्य आणि समीक्षा नाटककार खाडिलकर एक अभ्यास मराठी ज्ञानप्रसारक इतिहास व वाड;मय विचार, साहित्य शोध आणि बोध न. चि. केळकर वाड;मय दर्शन हरिभाऊंची सामाजिक कादंबरी, मराठी नाटक आणि रंगभूमी, काव्यातील दुर्बोधता, हरिभाऊंच्या कादंबरीतील व्यक्ती ही आणि इतर पुस्तके वाचल्यानंतर समीक्षेच्या त्यांच्या भूमिकेचा आपोआप बोध होतो.

वा. ल. कुलकर्णी यांनी नवसाहित्याच्या आरंभकाळात अत्यंत स्वागतशील वृत्तीने त्यांची पाठराखण करून वाड;मयीन वातावरण निर्माण केले.टीका लेखनाच्या पध्दतीला संश्लेषणात्मक विचारांचे वळण देणारा टीकाकार म्हणून कुलकर्णी यांना ओळखले जाते. साहित्य ही एका व्यक्तीमनाची निर्मिती असते. समीक्षेची प्रक्रिया ही शोधाची प्रक्रिया आहे आणि तो शोध शोधकाच्या विन्रम परंतु जिज्ञासू बुध्दीने घेतला जावा ही भूमिका वा. ल. कुलकर्णी यांची आहे. वा.ल. कुलकर्णी यांनी विस्तारपूर्वक वाड;मय विचाराच्या शोधार्थ ही समीक्षा करण्याचे आरंभिले. जेव्हा कुलकर्णी यांची समीक्षणपर पुस्तके वाचली तेव्हा साहित्याचा त्यांनी विपूल अभ्यास केला आहे. विपूल वाचन केलेले आहे. केवळ वाचन केले नाहीतर साहियविषयीचा सखोलपणे विचार केला. आणि गुण-दोष आपल्या भूमिकेतून मांडले.

वाड;मयीन समीक्षा ही कशी असली पाहिजे हे सांगताना कुलकर्णी समीक्षेविषयीची भूमिका व्यक्त करताना ते म्हणतात की, मी समीक्षा लेखन करतो ते माझ्या शंकाच्या समाधानासाठी मी वाड;मयाचे जेव्हा परिशीलन करतो. तेव्हा परिशीलन झाल्यानंतर माझ्या मनामध्ये अनेक शंका निर्माण होतात. आणि या शंकाच्या समाधानासाठी मी समीक्षा लेखन करतो. त्याचबरोबर वाड;मयविषयी आपल्याला जास्त समजावे, आकलन व्हावे यांसाठीदेखील समीक्षा लेखन केले जाते. वा. ल. कुलकर्णी यांनी आतापर्यंत थोडेच समीक्षालेखन केलेले आहे. वाड;मयामध्ये अभ्यास करीत असताना अनेक प्रश्नांची निर्मिती होते आणि तेव्हा अशा प्रश्नांची उत्तरे शोधणे गरजेचे वाटू लागते. या प्रश्नांची उत्तरे शोधली की मनाचे समाधान होते. आणि म्हणून माझे समीक्षालेखन हे प्रामुख्याने आत्मसुखार्थ झालेले आहे. वा. ल. नी समीक्षालेखन हे निरनिराळ्या वाड;मयप्रकारांवर केलेले आहे. ते एखाद्या कृतीचे परीक्षण असो . एखाद्या ललित लेखकाच्या लेखनाचे किंवा त्या कालखंडातील विशिष्ट वाड;मयप्रकारात झालेल्या समग्र लेखनाचे समालोचन असो. शेवटी वा. ल. समीक्षेविषयी एक विधान करतात, ते म्हणजे समीक्षा लेखन म्हटले की तो एक शोध आहे आणि तो शोध शोधकाच्या विनम्र परंतु जिज्ञासू बुध्दीने घ्यायला हवा. अशी कुलकर्णी यांची श्रद्धा आहे.

समीक्षालेखन हा एक शोध आहे असे म्हटले तर तो कशाचा असा प्रश्न मनांमध्ये उपस्थित होतो. तर हा शोध असतो. वाड;मयाच्या प्रकृतीचा, प्रयोजनाचा, वाड;मय घेत असलेल्या विविध रुपांचा वाड;मय उपस्थित करित असलेल्या प्रश्नाचा थोडक्यात म्हणजे वाड;मयासंबंधीच्या सर्व सत्यांचा असेच ह्या प्रश्नाचे उत्तर होय. हा शोध कधीही संपत नाही. तो तसाच चालू राहतो. वाड;मयातील शोध हा असाच अखंडपणे चालू राहतो. जीवनान्तर्गत सत्यांचा शोध कधी तरी संपणे शक्य आहे काय ? हा शोध वाड;मयाचा कधीही संपणार नसेल तर जीवनातून प्रतिक्षणी जन्माला येणारे जीवनाप्रमाणे नित्य नविन रुपे घेणारे ओळखीचे वाटत

लक्षात आला. जेव्हा अभ्यासाच्या व्यासंगामुळे अनेक साहित्यकृतींचे वाचन कुलकर्णी यांनी डोळस पणे केले. केवळ वाचन करून ते थांबले नाहीत. तर ते साहित्य विचार ही करित असत. नविन ललितकृतीच्या संदर्भामध्ये मूल्याचा शोध स्पष्ट करून घेणे गरजेचे वाटू लागते. तो जर विचार वरचेवर केला नाही तर त्यावर आगंतुक व कसल्या तरी अनिष्ट विचारांची व कल्पनांची धूळ साचण्याची शक्यता असते. त्याला एक प्रकारचे नीर्जिवत्व व यांत्रिकता येण्याची भीती असते. तसे झाल्यास त्याचे प्रयोजन संपले असे म्हणणे बरे वाड;मयाचा विचार जर आखीव-रेखीव नियमांनुसार केला तर ठरीव नियमांनुसार केला तर वाड;मयाचा विचार साहित्याच्या मूल्यमापनाला उपकारक ठरत नाही. तसाच तो वाड;मयासंबंधीची समजही अधिक निर्दोष करीत नाही. हा साहित्याचा विचार एखाद्या हिशेब तपासनीसाने केलेल्या कामासारखा असतो. म्हणूनच वाड;मयत्वाला वाड;मयत्व लाभत असते. ते प्रत्येक श्रेष्ठ वाड;मयकृतीतील मन गोंधळून टाकू पाहणारे चैतन्यतत्व लक्षात घेतलेले नसते. तर पुष्कळदा वर्गीकरण, पृथक्करण सिद्धान्तन इत्यादींच्या साहाय्याने केलेले वाड;मयपरीक्षण हे असेच निर्जीव होण्याची भीती असते. म्हणून वा. ल. कुलकर्णी या संदर्भासाठी एक उदाहरण देतात. नियम हे माणसासाठी असतात. माणूस हा नियमासाठी नसतो. ह्या प्रसिद्ध केशवसुतोक्तीमुळे थोडासा बदल करुन कुलकर्णी म्हणतात की, नियम हे साहित्यासाठी असले तरी साहित्य हे नियमासाठी नसते. साहित्य ही अखंड, विकासक्षम अशी चिद्‌वस्तू आहे. तेव्हा तिचे एकदाच नियमन व्हावे कसे ? म्हणूनच साहित्याचे व साहित्यसमीक्षेचे काटेकोर शास्त्र तयार होत नाही. शास्त्र कशाला म्हणावयाचे ज्यामध्ये नियम असतात. ज्यामध्ये सूत्र असतात, नियम, गुणधर्म, सिद्‌धांत असतात. याला आपण शास्त्र म्हणतो. साहित्याला शास्त्र मानणे कितपत योग्य होते. साहित्याचा आपण विचार केला तर असे दिसून येते की साहित्याचे जर नियम तयार होत नसतील. त्याला ठराविक गुणधर्म नसतील त्यामध्ये काही सिद्‌धान्त नसतील तर साहित्याचे शास्त्र होऊ शकत नाही. समीक्षेचा जर विचार केला तर समीक्षेचे शास्त्र होऊ शकत नाही. समीक्षेला ठराविक नियम नसतात. तत्संबंधीचे मोजमाप करण्यास उपयोगी पडणारी कायमची सोयीस्कर कोष्टके तयार होत नाहीत. ही कोष्टके तयार होताच त्यातून हाती येते ते साहित्य नव्हे ते साहित्याचे कलेवर.

साहित्याचे समीक्षण तुम्ही कशासाठी करता ? असे जर कोणी वा. ल. ना. विचारले तर वा. ल. असे उत्तर देतात की, मी आत्तापर्यंत बरेच समीक्षा लेखन केले. निरनिराळ्या प्रकारच्या साहित्यकृती त्यांच्या नजरेसमोर आल्या आणि ह्या साहित्यकृती श्रेष्ठ आहेत की कनिष्ठ आहेत एखादी साहित्यकृती चांगली आहे की वाईट आहे यांसारख्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी वा. ल. नी क्वचितच समीक्षा लेखन केलेले आहे असे वा. ल. ना वाटते. वा. ल. नी समीक्षा लेखन लिहले ते अशासाठी की, आपल्या हाती आलेली साहित्यकृती ही काय व्यक्त करु पाहत आहे ती कोणते रुप घेत आहे. जे तद्‌वारा अभिव्यक्त होऊ पाहत आहे. त्याला स्वत:चे रुप किती गवसले आहे. जे जाणवत आहे ते कितपत अपूर्व आहे. लक्षणीय आहे. त्यातूनच त्या विशिष्ट अनुभवाची अनन्यसाधारण प्रकृती कितपत व्यक्त होत आहे इत्यादी प्रश्नांचा विचार त्या साहित्यकृती संदर्भात करावा हीच समीक्षा लेखनामागील वा. ल.ची प्रेरक भूमिका आहे. निदान प्रत्येक समीक्षकाची भूमिका हीच असायला पाहिजे असे वा. ल. कुलकर्णी सांगतात. अशाच स्वरुपाचे साहित्यकृतीबाबत कितीतरी प्रश्न निर्माण होतात. तो सोडविण्याचा प्रयत्न होतो. हा विचार पुढे सरकू शकतो. व समीक्षक शेवटी

त्याला कळत न कळत वाड;मयीन महात्मतेच्या प्रश्नांकडे वळतो. असा वा. ल. चा अनुभव आहे. एखादी साहित्यकृती ही साहितयकृती म्हणून ठीक असली तरी ती श्रेष्ठ साहित्यकृती आहे काय? हा वाड;मयीन समीक्षेमधील एक कूट प्रश्न ठरतो. दोन कविता दोन साहित्यकृती आपल्यासमोर असतात. परंतु त्यातील एक साहित्यकृती किंवा एक कविता आपल्याला श्रेष्ठ चांगली आहे. आपल्याला ती आवडते. परंतु ती कशाच्या आधारे आपल्याला आवडते ती आपल्याला का चांगली वाटते. त्याला कोणती कारणे असतात. अमुक एक कलाकृती श्रेष्ठ म्हणायला कोणते गुण कारणीभूत असतात. याचा शोध घेणे गरजेचे वाटू लागते. उदा.- हरिभाऊ आपटे आणि डॉस्टोव्हस्की या दोहोंची तुलना केली तर डॉस्टोव्हस्की आपल्याला का श्रेष्ठ वाटतो. हा प्रश्न आस्थेवाईक समीक्षकापुढे उभा राहतो. आणि त्या प्रश्नाचा शोध घेतल्याशिवाय त्याला चैन मिळत नाही. हा शोध अतिशय गुंतागुंतीचा आणि कठिण असतो. तरी देखील तो घ्यावाच लागतो. आणि हा शोध घेताना सतत एक भीती वाटते. हा शोध म्हणजे वाड;मयीन महात्मतेचा शोध, तेव्हा तो शोध घेताना त्या मूल्यांवर लक्ष ठेवावयाचे ती कोणती ? ही मूल्ये वाड;मयबाह्य तर नाहीत? येथे आपल्याला चौकशी करायची असते. ती कशाची ? ललित कृतीतून व्यक्त होऊ पाहणाऱ्या अनुभवाची ? मग आपण जोखतो. ती महात्मा ह्या अनुभवाची की त्या एकंदर ललितकृतीची असे मनांत संभ्रम उत्पन्न करणारे निरनिराळे प्रश्न डोळ्यांसमोर उभे राहतात. ह्या सर्व शंकांचे समाधान होईल असाच मार्ग त्याला शोधायचा असतो. ललितकृतीतील अनुभव वेगळा न करता आपणांस हा शोध घेता आला पाहिजे. अनुभवाचा जर आपण स्वतंत्रपणे विचार करु लागलो तर आपल्या शोध चुकीच्या मार्गावर जाण्याचा संभव आहे. त्या अनुभवाची कक्षा, त्याची खोली, त्याचे मूलगामित्व ह्या सर्वांचा विचार प्रस्तुत खरा. परंतु तो त्या अनुभवाला ललितकृतीपासून अलग करता कामा नये. तो विचार सतत त्या ललित कृतीसंदर्भातच केला पाहिजे. कारण ती ललितकृती म्हणजेच तो अनुभव हा ललितकृतीपासून वेगळा नाही तो आपण वेगळा करु शकत नाही. याची जाण समीक्षकाला ठेवावी लागते. त्याशिवाय ह्या वाड;मयीन महात्मतेचा शोध अचूकपणे घेता येणार नाही. ही शिस्त अवघड असते. जो समीक्षक आपली ललितकृतीवरील पकड ढीली न करता साहित्यविचार करतो. अशीच समीक्षा पावले योग्य दिशेने टाकते. मग ती एखाद्या ललितकृतीचा वाड;मयीन महात्मतेचा शोध घेत असो वा एखाद्या ग्रंथकाराच्या समग्रलेखनाच्या वाड;मयीन महात्मतेच्या दृष्टीने विचार करीत असते.

वा. ल. कुलकर्णी आपल्या अनुभवाचा विचार करतात. त्यांचा स्वत:च अनुभव सांगताना ते म्हणतात की, वाड;मये तिहासाच्या प्रांतामध्ये साहित्यसमीक्षेला जपून पावले टाकावी लागतात. कारण वाड;मयेतिहास हा एका कालखंडातील वाड;मय व्यवहाराचा इतिहास असतो. असा त्यांचा स्वत:चा अनुभव आहे. ह्या वाड;मयव्यवहाराचे रुप न्याहळण्याचा समीक्षक प्रयत्न करतो. हा प्रयत्न करताना त्या कालखंडातील राजकीय, सामाजिक, धार्मिक व इतर क्षेत्रातील नाना प्रकारच्या व्यवहारांची घेतलेली रुपेही वा. ल.च्या लक्षात येत असतात. ह्या विविध क्षेत्रातील घडामोडींकडे त्यातील विचारप्रवाह त्यांनी जीवनाला लावलेली वळणे ह्या सर्व गोष्टींकडे त्यांचे आपोआप लक्ष जाते. आणि ते जाणे भागच असते. कारण त्या कालखंडातील वाड;मय व्यवहार हा त्या कालखंडातील एकंदर जीवनव्यवहाराचाच भाग असला तरी तो आपल्या परीने एक स्वायत्त व्यवहार आहे तो स्वंयशासित, स्वयंनियप्रित व्यवहार आहे. हे कधीच विसरुन

चालत नाही. विशिष्ट कालखंडात त्यांचे रुप न्याहाळताना त्यांचे शासन नियमानुसार होते. ते नियम प्रथम मनात बाणले पाहिजेत. त्यांचा विकास, विस्तार व ऱ्हास ज्या लक्षणांवरून ओळखायची ती लक्षणे आत्मसात झाली पाहिजेत. अनेक व्यक्तीमनांनी जीवन व्यवहाराला निरनिराळी रुपे प्राप्त करुन दिलेली असतात. त्या व्यवहारामागील ह्या विविध व्यक्तीनिष्ठ प्रेरणांचे स्वरुप व त्यांचे कार्य. त्यांच्या त्या कालखंडातील युगधर्माशी असणारा संबंध ह्यासंबंधीची नीटशी जाण असली पाहिजे. तरच ते वाड;मयइतिहासाचे अत्यंत अवघड कार्य नीट तडीस जाण्याची शक्यता असते. नाही तर भलतीकडे जाते.

एखाद्या कालखंडातील वाड;मयेतिहास लिहताना बऱ्याच वाड;मयप्रेमी अभ्यासकांना मोह होतो तो म्हणजे त्या कालखंडातील वाड;मयीन प्रवृत्ती शोधून काढण्याचा किती केले तरी तो एक इतिहास असतो. व इतिहास म्हटला म्हणजे तो ज्या व्यवहाराचा इतिहास असेल त्या व्यवहारातील प्रवृत्ती शोधून काढायला हव्याच. स्वाभाविकच प्रत्येक वाड;मे तिहासाची प्रवृत्ती हे विशिष्ठ कालखंडातील वाड;मयप्रवाह शोधून काढण्याकडे असते. परंतु वा. ल. कुलकर्णी यांना नेहमी अपरिहार्य गोष्टीत एक धोका जाणवत आला आहे. सर्वसामान्य मानवाप्रमाणे सर्वसामान्य वाड;मयकृतीची प्रवृत्ती प्रवाहाबरोबर वाहत जाण्याची असली तरी खरी वाड;मयकृती ही एखाद्या व्यक्तीत्व संपन्न माणसांप्रमाणे प्रवाहपतीत होण्याचे टाळीत असते. तिच्या ठिकाणी आपणांस साधारणत्वापेक्षा अनन्यसाधारणत्वच अधिक जाणवत असते. तिच्या या अनन्यसाधारणत्वाला बाधा येण्याची शक्यता असते. हे वाड;मयनिर्माते एकाच कालखंडातील असतात. परंतु प्रत्येकाची प्रकृती ही भिन्न भिन्न असते. आणि हे वेगळेपण आपणांस जाणवल्याखेरीज राहत नाही. म्हणूनच तो एखाद्या वाड;मयीन प्रवृत्तीचा तो प्रतिनिधी असे माणने अन्यायकारक ठरते. एखादा वाड;मयेतिहास एका विशिष्ट कालखंडातील वाड;मयीन प्रवृत्तीची नोंद करताना ती नोंद अशा-प्रकारच्या वाड;मय निर्मात्यांच्या अनन्यसधारणात्वाला बाधा न येऊ देता करणे म्हणूनच अत्यंत इष्ट आहे. हे कार्य करताना त्याला सत्याची कदर लागते. वाड;मयव्यवहाराची अचूक समज लागते. वाड;मयासंबधीच्या निष्कर्ष परत परत तपासून पाहून ते सुधारण्याचे त्यांना आवश्यक ती पदोपदी मुरड घालण्याचे धैर्य लागते. ह्या सर्व विवेचनावरुन वा. ल. कुलकर्णी समीक्षकांबद्दल एक विधान करतात. खऱ्याखुऱ्या शोधकाची विनम्र परंतु जिज्ञासू बुद्धी लागते. असेच मला वाटते.

'ललितकृती' ही एक गूढ असते. हे गूढ जणू आपल्या समीक्षाबुद्धीस आव्हान देत असते. हे आव्हान नम्रतापूर्वक स्वीकारण्यात मौज असते. अमुक एक कृती 'ललितकृती' ह्या दृष्टीने आपल्या मनात भरत नाही. वरवर पाहता तिच्यात नाव ठेवण्याजोगे काही दिसत नाही. असे वाटते. अशा वेळी ललित कृती ह्या दृष्टीने तिच्यात काय कमी असल्यामुळे असे वाटते हे शोधण्यात आनंद असतो. कारण हा शोध परत जे लक्षात आलेले नसते. परंतु ज्याची उणीव जाणवत असते. अशाच वाड;मयीन मूल्यांचाच शेवटी शोध ठरतो. ललितकृती ह्या दृष्टीने यत्किंचितही डोळ्यांत न भरणारी एखादी कृती ही ह्याप्रमाणे समीक्षाबुद्धीला चालना देते. कारण जसे अमुक एक ललितकृती श्रेष्ठ आहे हे जसे सांगणे कठीण आहे. तसेच अमुक एक कलाकृती कनिष्ट आहे हे सांगणे ही अवघड असते. असा वा. ल. कुलकर्णींचा स्वतःच अनुभव आहे. हे सांगण्यासाठी ललितकृतीची पकड ही घट्ट असणे आवश्यक आहे. एखादा अनुभव हा कलारुप घेऊ शकला असेल किंवा तो कलारुप घेऊ शकला नाही असे वाटत असल्यास ह्यांसारखे प्रश्न ललितकृतीची अन्तर्बाह्य

परीक्षा करुनच सोडवावे लागते. ह्या प्रश्नांचा शोध घेणे एवढे सोपे नसते. हा शोध म्हणजे शेवटी वाङ;मयीन मूल्यांचाच शोध ठरतो. वाङ;मयाच्या प्रकृतीसंबधीचा आपला विचार निर्दोष करायला तो उपकारक ठरतो. जेथे ही सामान्य ललितकृतीबाबत आणि ललितकृतीबद्दल खरी ठरते तेथे ज्या ललितकृती ह्या खरोखरच श्रेष्ठ असतात. त्यांच्या बाबतीत ती किती प्रमाणात महत्वाची ठरत असेल ह्यांची कल्पना केलेली बरी. ह्या कृतीना आपणांस दिलेले आव्हान फारच नम्रतापुर्वक स्वीकारावयाचे असते. ते जणू आपले गूढ उकलण्यासाठी जीवनानेच दिलेले आव्हान असते. हे गूढ कधीच पूर्ण उकलले जाण्याची शक्यता नसते. हॅम्लेटचे गूढ उकलणे कधी तरी शक्य आहे काय? अशा वेळी हे गूढ उकलण्याचा नव्हे तर त्याच्या अंतरंगाचा शोध घेण्याचा आपण केलेला प्रत्येक प्रयत्न आपल्या पदरात अनेक वाङ;मयीन मूल्यासंबंधीची अधिक निर्दोष समज टाकीत असतो. त्या श्रेष्ठ ललितकृतीची समज आपणांस अधिकाधिक समजायला लागते. म्हणजेच याचा अर्थ असा होतो की आपल्या समीक्षाबुध्दीची कुवत वाढत जाते. प्रत्येक श्रेष्ठ ललितकृती समीक्षकापुढे अवतरते. ती आपली पारख करून घेण्यासाठी नव्हे तर त्याच्या समीक्षाबुध्दीला उजाळा देण्यासाठी हा वा. ल. कुलकर्णी यांचा स्वत:चा अनुभव आहे.

'ललित' साहित्यासंबंधी उपस्थित केलेला कोणताही प्रश्न मग तो त्या साहित्याच्या भाषाशैलीचा असो रसिकाच्या मनात होणाऱ्या त्याच्या परिणामासंबंधी असो. हा सोडविण्यास सोपा नसतो व त्या प्रश्नांची उत्तरे सुटसुटीत देणे धोक्याचे असते. ह्या प्रश्नांची निर्णायक उत्तरे देण्याऐवजी त्यांचे स्वरुप नीट लक्षात घेणे, ललित साहित्याच्या प्रकृतीच्या दृष्टीने त्यांचा शोध घेणे, ह्या शोधात हाती लागलेले सत्यांश गोळा करणे व एकेक पाऊल योग्य दिशेने पुढे पुढे टाकणे ह्यातच वा. ल. ना सतत स्वारस्य वाटलेले आहे. ह्याच दृष्टीने वा. ल. समीक्षा लेखन म्हणजे कधी न संपणारा अखंड शोध असेच सतत मानीत आले आहेत. समीक्षेला वाङ;मयकृतीबद्दल सारखेच कुतुहल वाटले पाहिजे. तिने सर्व प्रकारचा वाङ;मय विचार मग तो कोणत्याही भाषेतील असो. सारख्याच जिज्ञासू बुध्दीने तपासला पाहिजे. मिळतील तेथून वाङ;मयाच्या अंर्न्तबाह्य स्वरुपासंबंधीच्या सत्याचे कण गोळा केले पाहिजेत. तिने भाषेचा, धर्माचा, विशिष्ट मतप्रणालीचा अभिमान बाळगून आपली दृष्टी संकुचित होऊ देता कामा नये असेच त्यांचे मत आहे आपण करतो ती समीक्षा 'ललित' वाङ;मयातील असली तरी तिच्यामागील लालित्य म्हणजे काय? ह्यासंबंधीची समज अचूक होण्याच्या दृष्टीने ललित वाङ;मयकृती बरोबरच इतर ललित कलातील कृतीचाही डोळस आस्वाद समीक्षकाने सतत घेतला पाहिजे. त्या कलाव्यवहाराबद्दल तितकाच जिव्हाळा, तितकीच जिज्ञासा वाटली पाहिजे. ह्याशिवाय त्याच्या समीक्षेला खरा अर्थ प्राप्त होणार नाही अशी वा. ल. ची समजूत आहे.

वा. ल. समीक्षा लेखन का करतात? हे सांगताना केवळ कारण सांगून पूर्णता येणार नाही. त्यासाठी समीक्षेचे उद्दीष्ट तिचे स्वरूप तिची प्रतिज्ञा ह्यासंबंधीची भूमिका विशद करावी लागते. वा. ल. कुलकर्णी स्वत: शेवटी आत्मविश्वासपूर्वक सांगू शकत नाहीत. स्वत:ला तरी भूमिका जमली की नाही याबद्दल त्यांना शंका वाटायला लागते. आणि यापुढे किती साधणार आहे? असा प्रश्न शेवटी ते स्वत:ला विचारतात.

वाङ;मयीन टीका आणि ललित लेखक यांचा परस्पर संबंध वा. ल. कुलकर्णी यांनी स्पष्ट केलेला आहे. लेखकाला टीकाकारापासून कोणकोणत्या दक्षता बाळगली पाहिजे हे वा. ल. कुलकर्णी सांगतात. वाङ;मयीन टीका म्हणजे वाङ;मयरहस्याचा शोध हा शोध शोधकाच्या वृत्तीने घेतला जाण्यात वाङ;मयीन

टीकेची फलश्रुती आहे. एखादा टीकाकार ललितकृतीच्या सुखाने सौंदर्याने वेडावलेला असतो. त्याच्या रहस्याचा शोध घेण्याचा तो प्रयत्न करणे हे ललितकृतीचे सौंदर्य म्हणजे काय किंवा अनेक प्रश्नांचा शोध घेण्याचा तो प्रयत्न करतो. ह्या प्रश्नांचा ललितकृतीसंबंधात घेतलेला त्याचा शोध म्हणजेच त्याची टीका. ही टीका लिहीलेली असते. ती निर्मित्यासाठीही नाही व वाचकांसाठीही नाही केवळ स्वतःच्या शंकाच्या समाधानासाठी टीकाकार टीकालेखनासाठी प्रवृत्त होतो तो शोधकाच्या वृत्तीने वाड;मयाचा शोध घेण्यातच शोधकाला स्वारस्य वाटत असते. प्रत्येक साहित्यकृती आपल्यापरीने अनेक वाड;मयीन प्रश्नांना जन्म देते. आपला विचार निर्दोष करायला ललित लेखकाला आनंद वाटतो. ग्रंथाचे परीक्षण करताना त्याची भूमिका न्यायाधिशाची नसते तर विन्रम शोधकाची असते. आणि ती असायला हवी असे वा. ल. कुलकर्णी यांना वाटते. ललित लेखक वाड;मयीन टीकेचा शोध हा ललित लेखक व वाचक यांना उपयोगी पडण्यासाठी लिहली जात नाही.

वाड;मयीन टीकेतून अनेक वेळा शोधकाइतकीच किंबहुना जास्त बोधकाची भूमिका डोकावत असते. तिचा उद्देश समोर असलेल्या ललितकृतीच्या मूल्यमापनाचा असतो. ती उघड उघड परार्थ असते. ललित लेखकांना आणि वाचकांना शहाणे करणे हाच तिचा उघडउघड उद्देश असतो. ही टीका ललित लेखकाला शाबासकी देण्यासाठी किंवा त्याच्या हातून कळत नकळत घडलेल्या दोषांबद्दल त्याचा अधिक्षेप करण्यासाठी जन्माला येत असते. वाड;मयाच्या मूलतत्वांवरील पकड ढीली होऊ न देता प्रत्येक ललितकृतीच्या अंतरंगाच्या विन्रम वृत्तीने घेतलेल्या शोधातून जन्माला आलेली टीका ही वाड;मयव्यवहाराचे वातावरण, स्वच्छ, निरोगी ठेवण्यास मदत करीत असते. तिने चाचपडत घेतलेल्या वाड;मयीन सत्यांचा शोध वाचकांच्या ठिकाणी वाड;मयासंबंधीची सुजाण दृष्टी निर्माण करण्यास मदत करीत असतो. हीच टीका ललित लेखकाला उपयुक्त ठरण्याची शक्यता असते.

ललित लेखक काय व्यक्त करू पाहत आहे तो जे व्यक्त करू पाहत आहे. ते कलारुप घेऊ शकत आहे काय, ते कितपत अर्थपूर्ण आहे त्याला त्याचे यथार्थ रुप गवसत आहे काय? गवसत नसल्यास ते का गवसत नाही इत्यादी अनेक प्रश्नांचा विचार करण्याचा ही टीका प्रयत्न करीत असते. अशा प्रकारची टीका एक प्रकारे विशिष्ट कृतीच्या कलानिर्मिती प्रक्रियेचा शोध घेते. तिची अनन्यसाधारण प्रकृती समजून घेते. जे व्यक्त असते. त्यावरून जे व्यक्त होण्यासाठी ती धडपडत असते. त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न करते. हा शोध म्हणजे तिच्या कलाबीजाचा शोध घेणे असते. परंतु हा शोध घेत असताना तिचे कार्य तेथेच संपत नाही. ती स्वतःला अनेक प्रश्न विचारते ती ते त्या ललितकृतीला अनेक प्रश्न विचारते. अनेक प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करते. आणि जर प्रश्नांचा शोध लागला नाही तर उत्तरे मिळविण्यासाठी धडपड करीत असते व शोध मिळविल्याशिवाय राहत नाही. ह्या दृष्टीने विचार केल्यास ही टीका सदर कलाकृतीच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न करते व तिच्या निर्मिती प्रक्रियेचा शोध घेते. निर्मिती प्रक्रियेचा शोध घेत असताना समोर असलेल्या निर्मात्याचा प्रतिभेने काय साधले आहे काय साधू शकत नाही, तिच्या निर्मिती प्रक्रियेत कोठे विक्षेप दिसतो. अशा प्रकारची टीका केल्यामुळे निर्मात्याला आपल्या चुकांची जाणीव होते. आपल्यातील अपूर्णतेची उणिवांची जाणीव ही टीका निर्माण करून देत असते. म्हणून अशा प्रकारच्या वाड;मयीन टीकेचा उपयोग ललित लेखकास होईल अन्य दृष्टीने नव्हे असे मला वाटते. अशा प्रकारच्या वाड;मयीन टीकेचा

उपयोग हा ललित लेखनास थोड्या फार प्रमाणात होतो.

वाङ;मयीन टीका म्हणून समजल्या जाणाऱ्या दुसऱ्या एका प्रकारच्या लेखनाचा 'ललित' लेखकांना उपयोग होतो. हे लेखन एखाद्या ललितकृतीमध्ये झालेल्या व्याकरणाच्या, शब्दयोजनेच्या, वाक्यप्रचारांच्या, वाक्यरचनेच्या, परिच्छेदांच्या, मांडणीच्या चुका दाखविते. तिच्यात झालेला कालविपर्यासाचा, स्थलविपर्यासाचाप्रमाद लेखकाच्या लक्षात आणून देते. माहितीच्या बारीकसारीक चुका निदर्शनास आणून दाखविते. ललितकृती छंदोबध्द असल्यास तिच्यात आढळणाऱ्या छंदोरचनेच्या चुका टिपण्याचा प्रयत्न करते. वाङ;मयीन टीका म्हणून समजल्या जाणाऱ्या टीकालेखनात अशा प्रकारच्या लेखनाचा भाग बऱ्याच वेळा भरपूर असतो. ह्या प्रकारच्या टीकालेखनामुळे ललित लेखकांना आपल्याकडून सुधारल्या जाण्याजोग्या अनेक प्रकारच्या चुकांची जाणीव होते. व त्या सुधारण्यास मदत होते. असे असले तरी अशा लेखनाला वाङ;मयीन टीका म्हणून संबोधले जाणे चुकीचे ठरते. कारण टीकाकाराने दाखवून दिलेल्या या चुका लक्षात यावयास वाङ;मयाच्या प्रकृतीची समज असण्याची गरज नसते. ज्याला वाङ;मयाच्या मूलतत्वांची समज नाही. असाही एखादा माहीतगार ह्या किंवा असल्या चुका दाखवू शकतो व सुधारूही शकतो. तेव्हा अशाप्रकारच्या लेखनाने ललित लेखकांना आपल्या हातून घडणाऱ्या काही लेखन प्रमादांची जाणीव झाली व ते सुधारण्या व टाळल्यास मदत झाली. तशी वाङ;मयीन टीका त्याचे मोल शून्यच ठरते.

टीकालेखन आणखी एका प्रकाराने होते. तो प्रकार म्हणजे हे लेखन विशिष्ट ललितकृतीचा जनमनावर कोणत्या प्रकारचा परिणाम होणार आहे तो परिणाम समाज हिताच्या दृष्टीने कितपत इष्ट आहे व अनिष्ट आहे हे सांगण्याचा प्रयत्न करीत असते. अशा प्रकारचे टीकालेखन ललित लेखकाला उपयोगी ठरत नाही. आपल्या ललित लेखनाकडे समाज कोणत्या दृष्टीकोणातून पाहत आहे. समाजाकडून कोणत्या लेखनाची अपेक्षा आहे यासाठी हे लेखन निश्चित उपयोगी ठरते. परंतु वाङ;मयाच्या प्रकृतीसंबंधीच्या व प्रयोजनासंबंधीच्या अज्ञानातून व उदासिनतेतून मूलत: असल्या लेखनाचा जन्म झाल्यामुळे त्याचा हाडाच्या ललित लेखकाला काडी इतकाही उपयोग होत नाही ह्या लेखनाला वाङ;मयीन टीका कितपत म्हणावे असाही प्रश्न उपस्थित होतो.

आणखी एक प्रकारचे टीकालेखन म्हणजे या प्रकारातील टीकालेखन नेहमी ललित लेखनाच्या तथाकथित परिणामकारकतेचा विचार करण्यातच जणू गढलेले असते. कथेचा शेवट हुकलेला आहे तिचा प्रारंभ चित्तवेधक नाही. तिला अंती एक प्रकारची कलाटणी दिली जाणे आवश्यक होते. अशा प्रकारची विधाने सदर टीकालेखनात सतत येतात. सकृदर्शनी अशा स्वरुपाचे टीकालेखन ललित लेखकाला उपयुक्त ठरावे असे वाटते. अशा स्वरुपाचे लेखन ललित लेखनाकडून कारागिरीची अपेक्षा करते. तर खरी वाङ;मयीन टीका एखादी ललितकृती वर वर पाहता ललितकृतीतील चैतन्याचा किंवा त्याच्या अभावाचा शोध हाच वाङ;मयीन टीकेचा मुख्य उद्देश असल्यामुळे कारागिरीला म्हणजे चैतन्यशून्य रुपाला महत्व देऊ पाहणारी ही वाङ;मयीन टीका या पदवीला पात्र ठरत नाही.

ह्या दृष्टीने वाङ;मयीन टीकेचे नेमके उद्दीष्ट काय? तिची कार्यपध्दती कोणती? तिची व्याप्ती काय? तिच्याकडून आपण कोणत्या अपेक्षा कराव्यात हे प्रश्न आपण आपल्या मनाला प्रथम विचारले पाहिजेत असे वाटते. आपण ह्या प्रश्नांची उत्तरे शोधू लागलो तर आपोआपच वाङ;मयीन टीका म्हणून ओळखले जाणारे

कितीतरी लेखन हे निरूपयोगी असते असे वा. ल. चे म्हणणे नाही. त्याची उपयुक्तता सहज मान्य होण्यासारखी आहे. परंतु ती उपयुक्तता वाड;मयाचा वाड;मय या दृष्टीने विचार करू लागताच अप्रस्तुत आहे.

वाड;मयीन टीका म्हणून ओळखले जाणारे लेखन हे जेव्हा वाड;मयाचे वाड;मयत्व शोधण्याच्या भूमिकेतून केले जाते. तेव्हाच ते वाड;मयाला उपयुक्त ठरण्याची शक्यता असते. हीच खरी वाड;मयीन टीका. अगदी प्रारंभीच स्पष्ट केल्याप्रमाणे ती प्रकृतीशः निर्हेतुक असते. परंतु म्हणूनच की काय कोण जाणे तिच्या प्रकाशात ललित लेखकाला आपण कोण आहोत. आपली धडपड कशासाठी चालली आहे आपल्या मार्गातील अडचणी काय आहेत. याची सुजाण कल्पना येण्यास जशी मदत होते तशीच वाचकालाही ती काय व्यक्त करू पाहत आहे तिचा निर्माता आपणांस काय देऊ पाहत आहे हे सर्व जाणून घेण्यासाठी कोणत्या दिशेने पावले टाकली पाहिजेत हे तिच्या मदतीने अंधुकपणे का होईना लक्षात घेण्याची आवश्यकता असते.

वाड;मयीन टीका आणि त्याविषयीची वा. लं.ची भूमिका त्यांनी स्पष्ट केल्यानंतर कुलकर्णी हे वाड;मयीन टीका आणि ललित लेखक यांचा परस्पर संबंध उलगडून दाखवितात. टीकेचे स्वरुप आणि टीकेचे प्रकार विशेष स्पष्ट करतात. त्यानंतर कुलकर्णी हे वाड;मयीन टीकेमध्ये काही समस्या निर्माण का होतात आणि त्या समस्या कोणकोणत्या आहेत ते वाड;मयीन टीका काही प्रश्न या लेखातून वाड;मयीन टीकेमध्ये कोणकोणत्या समस्या निर्माण होतात त्या टीकेला अडथळा बनतात. या समस्या नाहीशा करणे समीक्षकाच्या दृष्टीने सोयीचे असते. त्यामुळे वा. ल. कुलकर्णी समस्या सोडविण्याचे उपाय ही आपल्या भूमिकेतून मांडतात.

टीकाकार टीका एखाद्या ललितकृतीवर, एखाद्या ललित लेखकावर, एखाद्या कालखंडातील समग्र वाड;मयावर किंवा एका विशिष्ट वाड;मयप्रकारात झालेले त्या कालखंडातील लेखन हा विचार करताना टीकाकारांची प्रवृत्ती सर्वसामान्यपणे त्यांच्या प्रकृतीसंबंधीचे लक्षात राहण्याजोगे, आडाखे शोधून काढण्याकडे व बसविण्याकडे असते. एखादा ग्रंथकार वाड;मय प्रकारातील लेखनाला एखाद्या सुटसुटीत आडाख्यात एखादा ग्रंथकार एखाद्या वाड;मय प्रकारातील लेखन व एखाद्या कालखंडातील समग्र वाड;मय बसविता आले की टीकाकाराला आपले अंगीकृत कार्य सार्थकी लागले असे वाटते. याला कारण असे असावे की, आपण सर्वांच्या समजुतीप्रमाणे वाड;मयीन टीका हे एक शास्त्र आहे आणि इतर शास्त्राप्रमाणे त्याचे ही काम ते ज्याचे शास्त्र आहे त्याच्या घटनेचे नियम शोधून व त्यांच्या कृती व त्यांचे व्यवहार शोधून काढलेल्या नियमात सुव्यवस्थितपणे बसवून दाखविणे हेच असावे. अशी आपली कल्पना आहे. ह्या कल्पनेनुसार बहुधा आपण एखाद्या ललित कृतीच्या वा एखाद्या ललित लेखकांच्या समग्र वाड;मयाच्या परीक्षणाला प्रवृत्त होतो. व आपले परीक्षणकार्य शास्त्रशुद्ध करण्याची धडपड करीतो. विशेष शोधाअन्ती ही ललितकृती किंवा हे एखाद्या ललित लेखकाचे समग्र वाड;मय काही विशिष्ट आराखड्यात बसले किंवा बसविण्यात आले की, आपणांस हाती सत्य लागल्याचे एक समाधान लाभते. व वाचकांसही सदर परीक्षण लेखात आपणांस जणू त्या ललितकृतीच्या व ललित लेखकाच्या वाड;मयीन यशाचे रहस्य निश्चित सापडले ह्या समजुतीने विशेष आनंद वाटतो. परंतु अशा प्रकारे केलेला वाड;मयविचार हा खरोखरच मोलाचा असतो काय? तो टीकाकारांच्या बुध्दी वैभवाचा दयोतक असेल. अत्यंत सोयीस्कर असेल, सुटसुटीत असेल, लक्षात ठेवायला सोपा असेल, उपयुक्त असेल, निर्णयात्मक असेल पण म्हणून तो मोलाचा ठरतो काय? तो

कितपत वाङ;मय सत्यदर्शक असतो? हा विचार ललित वाङ;मयाच्या विकासाला कितपत उपकारक ठरतो? त्यातून व्यक्त होणारे सत्य हे पूर्णसत्य असते काय? ते पूर्णपणे ठरणे कधी तरी शक्य असते काय? ते पूर्णसत्य नसेल तर त्याचे निर्णयात्मक व निश्चयात्मक स्वरुप कितपत न्याय्य ठरते.

एखादूया साहित्यकृतीचा, वाङ;मयप्रकाराचा साहित्यातील समग्र वाङ;मयाचा किंवा विशिष्ट वाङ;मयप्रकारांत झालेल्या लेखनाचा विचार आपण आडाख्याच्या भाषेत करू काय? प्रत्येक खरीखुरी ललितकृती ही अनन्यसाधारण असते. तिच्यासारखी तिच असते. तिच्यासंबंधी आडाख्याच्या भाषेत बोलणे म्हणजे खरोखर तिचे अनन्य परतंत्र स्वरुप एका दृष्टीने लक्षात न घेणे होय. आपण आडाखे शोधून काढतो ते कोणाचे तर जे आडाख्यात बसते त्याचे आडाख्यात बसण्याजोग्या वस्तू ह्या बहुधा निर्जिव असतात किंवा कमी सजीव असतात. जे आडाख्यात बसू शकते. त्याची त्या आडाख्यानुसार प्रतिकृती होऊ शकते की, जी प्रतिकृती आणि वस्तू यांमध्ये प्रकृतिशः फरक उरत नाही. निर्जिव वस्तूची तंतोतंत प्रकृती असते. म्हणूनच बाजारात एकसारखी दुसरी खेळणी मिळू शकतात. यंत्राच्या साहाय्याने निर्माण होणाऱ्या वस्तू मिळू शकतात. प्रतिकृती होऊ शकत नाही ती जिवंत वस्तूची आणि खरीखुरी ललितकृती ही एक जिवंत असते म्हणूनच तिची अंतर्गत संघटना अनन्यसाधारण असते. प्रत्येक ललितकृतीत जीवनाचा हा धर्म तितकासा प्रतिबिंबीत होत नाही. ती ललितकृती या दृष्टीने कमी प्रतीची ठरते. ती जणू कमी सजीव असते. ज्या अनुभवाने तिच्यामधून रुप घेण्याचा प्रयत्न केलेला असतो तोच जणू चैतन्यरहित असतो. अशा ललितकृतीची टीका करीत असताना तिला एका ठराविक आराखड्यात बसविता येते. आणि तिचे नियम शोधता येतात. तिच्यात एक प्रकारची यांत्रिकता अवतरलेली असते. म्हणून तिची प्रतिकृती ही जाणवते. कलेपेक्षा तिच्यात कारागिरीचाच आपल्याला प्रत्यय जाणवतो. किटक आणि मनुष्य यांमध्ये खऱ्या अर्थाने जिवंत असतो तो मनुष्य दोघेही जगत असतात परंतु किटक जगत असताना आपल्या स्वच्छंदीपणाने जगत नाही. अनेक मर्यादा, ताबा त्याच्या जीवनावर असतो. तसे मानवाचे नाही. अनेक गोष्टीचे सामर्थ्य मानवाकडे असते. अनन्यसाधारण माणसे म्हणजे उदा:- टिळक, आगरकर अशा माणसांच्या सान्निध्यात आपणास जिवंतपणाचा साक्षात्कार घडतो. ते खऱ्या अर्थाने जीवन जगत नाहीत. त्याच्या जीवनाचे अडाखे बसविता येतात. खरे म्हणजे अशा लोकांनीच आपले जीवनरुप आडाख्यात बसविलेले असते. अशा लोकांच्या अनन्यसाधारणत्वाचा आपणाला फारसा प्रत्यय येत नाही. मात्र जे खरोखरच खऱ्या अर्थाने स्वंयनियंते असतात. त्यांच्याच बाबतीत खऱ्याखुऱ्या जिवंतपणाचा प्रत्यय येतो.

वरील सर्व उदाहरणे कुलकर्णी यांना एवढ्यासाठी दूयावीशी वाटतात की, खऱ्या अर्थाने जीवंत असणारी प्रत्येक वस्तू प्रत्येक श्रेष्ठ कलाकृती ही एक अशी वस्तू आहे की, ही अनन्यसाधारण असते. व जे अनन्यसाधारण असते. ते कोणत्याच आडाख्यात बसू शकत नाही. हे नीट लक्षात यावे. ह्या दृष्टीने विचार केल्यास हॅम्लेटसारखी 'ललितकृती' एका सुटसुटीत आडाख्यात का बसू शकत नाही. याचा उलगडा होतो. हॅम्लेट ही एक अत्यंत जीवंत कलाकृती आहे. तिच्या रोमारोमांत चैतन्य भरलेले आहे. ती शेक्सपिअरच्या प्रतिभेने साधलेली एक संपूर्ण नवनिर्मिती आहे. जो एक संमिश्र अर्थपूर्ण अनुभव त्याच्या अंगप्रत्यंगातून जीवनाचा, चैतन्याचा एकसारख्या साक्षात्कार घडत आहे. म्हणूनच हॅम्लेटचा शोध कधी तरी संपेल काय? हॅम्लेटचा शोध जेव्हा संपेल त्याच क्षणी जीवनाचाही शोध संपेल. हॅम्लेटचा शोध घेणे म्हणजेच प्रत्यक्षात

जीवनाचाच शोध घेणे होय. मेघदूतासंदर्भात, फुलराणी संदर्भात फुलराणी संदर्भात म्हणूनच आडाख्यांचा भाषेत बोलणे कधी तरी शक्य आहे काय ? आडाख्याच्या भाषेत बोलूनही त्याच्या चैतन्याला व अनन्यसाधारण मात्र ते बाधक ठरू नये अशी व्यवस्था साधावयाची कशी ? बालकवींना देखील स्वयंनिर्मित फुलराणीचा फॉर्म्युला शोधून काढता आला असता काय ? शक्यच नाही. प्रतिभावान मनाचा अनन्यसाधारण एखादा अनुभव प्रगट होतो. तेव्हा त्याचा प्रतिकृती साधने कधी तरी शक्य आहे काय ? आडाख्याच्या भाषेत बोलते ती कलाकृती नव्हे.

खऱ्याखुऱ्या शोधक टीकेला एखाद्या कलाकृतीसंबंधात आडाख्याच्या संबंधात बोलण्याचा मोह सदैव टाळावा लागतो. त्या टीकेजवळ कलेच्या प्रकृतीसंबंधीची सामान्य गमके असतात. हीच तिच्याजवळ खरीखुरी सामग्री असते. ह्याच सामग्रीच्या जोरावर तिला कोणत्याही श्रेष्ठ कलाकृतीच्या अनन्यसाधारणात्वाचा शोध घ्यावयाचा असतो. मनुष्य मात्रांच्या प्रकृती संबंधीच्या सामान्य गमकांच्या आधारेच आपण, आगरकर, टिळक, बुद्ध, येशू इत्यादी लोकांवर व्यक्तीमत्व लाभलेल्या व्यक्तींच्या अनन्यसाधारण जीवनाचा शोध घेऊ पाहतो. हा शोध घेऊ लागताच ही गमके किती अपूर्ण आहेत. याची जाणीव आपणाला होते. ही व्यक्तीमत्वे आपल्या शोधक बुद्धीला आव्हान देणारी आहेत. त्यांचे रहस्य लक्षात घ्यावयाचे असल्यास केवळ ह्या सर्व सामान्य गमकांवर भिस्त ठेवून भागणार नाही. त्यासाठी त्यांच्या अंतरंगाचा विशेष शोध घ्यावा लागतो. आपल्याजवळ असणाऱ्या गमकांना इतर विशेषांची जोड द्यावी लागते. हे आपल्या लक्षात येते. हे सर्व करीत असताना तो अनन्यसाधारणाचा शोध असतो. हे आपल्या लक्षात येते. अनन्यसाधारणाचा शोध घेण्यासाठी प्रथम आपल्याला साधरणाचीच कास धरावी लागते. कलाकृतीच्या नसानसातून वाहणाऱ्या चैतन्याने जे एक रुप तिला प्राप्त करुन दिलेले असते. त्याच्या संदर्भात तिच्यातील आपणांस गोचर होणाऱ्या बरीकसारीक तपशीलाचा अर्थ लक्षात घेणे हाच खऱ्याखुऱ्या टीकेचा उपयोग होत असतो. कलाकृतीचे रुप म्हणजे ज्याच्या गोष्टींमधून तिचा वेगळेपणा, तिचे अनन्यसाधारणत्व तिचा जिवंतपणाचा आपणांस जाणवत असतो. या सर्वांमधून एकसमयावरच्छेदकरुन आपणांस होणारी तिची जाणीव आपणांस अभिप्रेत असते. ह्या जाणीवे संदर्भात खरीखुरी शोधक टीका प्रत्येक श्रेष्ठ कलाकृतीतील अगदी बारीक सारीक गोचर तपशीलाचा अर्थ लावीत असते. म्हणूनच प्रत्येक कलाकृतीची प्रथम प्रकृती लक्षात घेऊन तद्नुसार हा शोध घ्यावा लागतो. त्यासाठी एकच एक धोपट मार्ग अनुसरुन चालत नाही. प्रत्येक वेळी त्या मार्गावरुन जपून पावले टाकावी लागतात. अशी जेथे परिस्थिती असते. तेथे आडाख्यांच्या भाषेचा काय उपयोग ? भाषेचा काय उपयोग ? अशी समीक्षा आडाख्यांच्या भाषेत कधीच बोलत नाही. एखाद्या श्रेष्ठ कलावंताच्या सर्व ललितकृती लक्षात घेऊन त्याच्या कलेची अशा कलावंताच्या कलेचा आडाखा बसविणे अत्यंत धोक्याचे ठरते. हॅम्लेट लिहितो. तेच टेम्पेष्ट लिहितो व तोच मिडसमर नाईटस् ड्रीम लिहिते. तिच्या सारखी तीच काढता येईल का ? तशा दृष्टीने प्रयत्न करणे हेही वेडेपणाचेच आहे. शेक्सपीयर, केशवसूत, बालकवि यांना एका सुटसुटीत, सोयीस्कर अशा आडाख्यात कधी तरी बसविता येईल काय ? अशा रितीने अशा कलाकृतींना आडाख्यात बसविणे सर्वच प्रयत्न फसवे ठरतात. खरीखुरी टीकाबुद्धी ही नम्र असते. ती शोधक असते. कलेपुढे नम्र झाल्याशिवाय तिच्या पोटात शिरल्याशिवाय तिच्या अंर्तमनाचा शोध घेणे अशक्य होऊन बसते. प्रत्येक जातीवंत श्रेष्ठ अनन्यसाधारण कलाकृतींना आडाख्यांच्या भाषेत बसविता येईल का ?

वाङ;मयेतिहासाची समीक्षा करित असताना टीकाकाराला येणाऱ्या समस्या म्हणजे एखाद्या वाङ;मयेतिहास एखाद्या वाङ;मय प्रकारातील त्या कालखंडातील लेखनाचा इतिहास असेल. वाङ;मयेतिहास एखाद्या वाङ;मयप्रकारातील त्या कालखंडातील लेखनाचा इतिहास असो. वा त्या कालखंडातील समग्र वाङ;मयाचा इतिहास असो टीकाकाराची दृष्टी त्या कालखंडातील सदर वाङ;मय प्रकारात झालेल्या लेखनात वा एकंदर समग्र वाङ;मयात दिसून येणाऱ्या सामान्य प्रवृत्ती शोधून काढण्याकडे व नमूद करण्याकडे असते त्या टीकाकाराने ह्या दृष्टीने लेखन केलेले असते. म्हणून तर आपण त्यांला वाङ;मयेतिहासकार म्हणून ओळखतो.

जेव्हा एखाद्या वाङ;मयेतिहासकार एका विशिष्टकालखंडातील वाङ;मयात आढळणाऱ्या सामान्य प्रवृत्ती लक्षात घेऊ लागतो व नमूद करु लागतो. तेव्हा त्या प्रवृत्ती जे प्रकृतीनेच सामान्य किंवा साधारण असते. त्या वाङ;मयात विशेषत्वाने प्रतिबिंबीत झालेल्या असतात. त्याच कालखंडातील परंतु जे प्रकृतीने असाधारण व अनन्यसाधारण त्यात त्या प्रतिबिंबीत झालेल्या नसतात. परंतु इकडे त्याचे दुर्लक्ष होण्याची पुष्कळदा शक्यता असते. त्या विशिष्ट कालखंडातील एकंदर वाङ;मय आपण संशोधिलेल्या वाङ;मयीन प्रवृत्तीत बसविण्याकडे त्यांचे मन ओढ घेत असते की जे प्रकृतीने अनन्यसधारण तेही लेखन मग ह्या प्रवृत्तीनुसार झाले असल्याचे सूचित करु लागतो. साधारण्य शोधून काढण्याच्या गडबडीत अनन्यसाधारणालाही साधारण्य पदवीला नेऊन बसविण्याची घोडचूक येथे होते. नियमात बसू शकते. प्रवृत्तीमध्ये अडकू शकते. ते जात्याच निर्जिव किंवा निदान कमी सजीव असते. हे आपण पाहिलेच जे जिवंत आहे. चैतन्याने न्हालेले आहे. म्हणूनच अनन्यसाधरण आहे ते साधारणावरुन निष्कर्षलेल्या नियमांत बसणार नाही. प्रवृत्तींच्या चाकोरीत सापडणार नाही. त्यांचा हा प्रवास एकदा असतो म्हणूनच त्याची दखल स्वतंत्र घ्यावी लागते. सर्वसामान्य अर्थाने आपण ज्याला इतिहास म्हणतो त्या एका विशिष्ट कालखंडातील सामान्य प्रवृत्ती नोंदविणाऱ्या इतिहासात लेखन नीटसे बसत नाही. हेच त्याचे खरोखर प्रकृति वैशिष्ट्य असते. हे खऱ्या इतिहासकाराने ओळखावयाचे असते. अनन्यासाधारण व साधारण जीवंत आणि निर्जीव, कला व अकला ह्यांची जो गल्लत करीत नाही त्यांचे परस्परसंबंध व प्रयोजन कार्ये ज्याने ओळखलेली असतात. तोच वाङ;मयेतिहासाचे कठिण कार्य थोडाफार अचूकपणे साधू शकतो.

वाङ;मयीन टीका ही तारेवरची कसरत आहे. मग ती कोणत्याही प्रकारची असो. ग्रंथावरील टीका, वाङ;मयेतिहासात्मक टीका असो ही कसरत 'ललित' वाङ;मयाच्या प्रकृतीवरील पकड थोडी जरी ढीली झाली तरीही तोल जाण्याची व टीका खाली कोसळण्याची भीती असते. वाङ;मयाच्या प्रकृतीवरील पकड असा शब्दप्रयोग वापरला परंतु ही पकड किती प्रमाणात आणि केवढ्या कालावधीवर वाङ;मयाचे परिशीलन केल्याने प्राप्त होते. हे सांगता येणे कठीण आहे. मला तर वाटते की, ह्या दृष्टीने विचार करणे हे देखील वाङ;मयाची प्रकृती नीटशी न ओळखण्याचेच लक्षण आहे. कारण वाङ;मयाची किंवा कलेची प्रकृती समजावून घेण्याच्या कार्याला तरी शेवट कोठून असणार हे वाङ;मयाच्या दृष्टीने टाकलेले नवीन पाऊलच असते. ह्या प्रत्येक नवीन पावलाने हाती नवीन काही तरी लागल्याची शक्यता असते. ह्या दृष्टीने विचार केला तर वाङ;मयीन टीका हा कधीही न संपणारा शोध आहे. सर्व प्रकृती समजून घेण्यासच शेवटी उपयोगी पडत असतो. ही सामान्य वाङ;मयकृतीदेखील एका दृष्टीने टीकाबुद्धीला आव्हानच देत असते. कारण तिची

सामान्यता ही देखील शोधअन्तीच लक्षात येणार असते. व ज्याला आपण सामान्यत्व म्हणतो. वा निर्जिवपणा म्हणतो. ते सामान्य का ? व तो निर्जीवपणा कशावरुन हे देखील आपणांस कलामूल्यांचा वा वाङ;मयमूल्यांचा शोध घेत असताच कळणार असते. ह्याच वृत्तीने खऱ्याखुऱ्या टीकेला पावले टाकावी लागतात. म्हणूनच तीची भूमिका बोधकाची कधीच राहू शकत नाही. ती भूमिका वाङ;मयांतर्गत सत्यांचा शोध घेऊ पाहणाऱ्या शोधकाचीच असावी लागते. हा शोध म्हणजे कधीही न संपणारी साधना आहे. याची जाण पदोपादी व्हावी लगाते. मग ती टीका ललितकृती म्हणून आपणसमोर येणाऱ्या एका कृतीची असो अशा अनेकविध ललितकृतींना जन्म देणाऱ्या प्रतिभेचा शोध घेऊ पाहणारी असो किंवा अशा अनेक प्रतिभावान मनांनी निर्माण केलेल्या एका विशिष्ट कालावधीतील अनेक कृतींचा व त्यांच्या निर्मात्यांचा एकदम एकसमसावच्छेदकरुन विचार करु पाहणारी असो. ही सर्वच टीका नम्र असते. ती कलेला शरण जाऊन केलेली असते. आणि ती तशी असते. म्हणूनच केवळ सार्थ होण्याची थोडीफार शक्यता असते.

वाङ;मयीन समीक्षेविषयीची भूमिका स्पष्ट करुन देताना वा. ल. कुलकर्णी वाङ;मयीन टीकेमध्ये येणाऱ्या समस्या नमूद करतात. नाटयसमीक्षा करताना देखील समीक्षकाच्या अज्ञानामुळे निरनिराळ्या समस्यांना सामोरे जावे लागते. ते अज्ञान कोणते आणि ते कसे दूर केले पाहिजे याविषयी कुलकर्णी यांनी उपायही मांडलेले आहेत.

समीक्षेकडे पाहण्याची सखोल दृष्टी वा. ल. कुलकर्णी यांची दिसून येते कारण कालखंडानुसार समीक्षेत कसकसा बदल होत गेला हेही आपल्या भूमिकेतून ते मांडतात. प्राचीन वाङ;मयीन टीकेविषयीचे स्वरुप वा. ल. सांगतात. ते म्हणतात की, गेल्या वीस, पंचवीस वर्षात मराठी वाङ;मय समीक्षा ही प्रौढ होत आहे. तिची समज वाङ;मयाच्या मूल्यमापनासंबंधी घाटासंबंधी अधिक प्रगल्भ होत चालली आहे. मराठी समीक्षेचा वाङ;मयाविचार हा अपुरा पडत आहे. अनेक गोष्टीचा नव्याने पुनर्विचार होणे आवश्यक आहे. याची जाण मराठी समीक्षेला आली आहे. मराठी समीक्षेला खडबडून जागे करण्याचे काम या समीक्षेने केले आहे. आज मराठी समीक्षा निश्चित नविन दिशेने पावले उचलीत आहे. याचे श्रेय मर्ढेकरांसारख्या तत्वचिंतकाला जसे आहे तसेच किंबहुना अधिकच समीक्षकांना सतत पुनर्विचार करायला लावणाऱ्या मराठी वाङ;मय क्षेत्रातील या नविन उन्मेषांना आहे. समीक्षा ही वाङ;मय सापेक्ष असते. वाङ;मयाने खऱ्या अर्थाने कात टाकल्या शिवाय व नविन चैतन्यमय रुप धारण केल्याशिवाय समीक्षाही कात टाकीत नाही व प्रगल्भ वाङ;मययाविचाराला जन्म देत नाही. आज मराठी वाङ;मय समीक्षेची पावले कोणत्या दिशेने पडत आहेत हे पाहणे म्हणूनच उद्बोधक आहे.

आज वाङ;मयाच्या घाटासंबंधीची म्हणजे form संबंधीची आधिक निर्दोष अशी समज मराठी वाङ;मयसमीक्षेतून व्यक्त होत आहे. वाङ;मयीन कलाकृतीमध्ये आशय आणि अभिव्यक्ती यांचे अभिन्नत्व असते. या जाणीवेतून ही समज जन्माला आली आहे. स्वाभाविकच समोर असणारी लेखन कृती ही कला आहे की करागिरी हा प्रश्न विचारला जात आहे.

नवीन समीक्षा एखाद्या वाङ;मयीन कृतीच्या घाटाची किंवा रुप सिद्धीची चिकित्सा करीत असताच सदर कृतीच्या अर्थवत्तेची म्हणजे वाङ;मयीन महात्म्यतेचेही चिकित्सा करण्याचा प्रयत्न करते. हे काम अवघड याची या नवीन समीक्षेला जाणीव आहे. व म्हणून ते करताना तिची पाऊले जपूण पडत आहेत. आजची मराठी समीक्षा ललित कृतीचा विचार करताना संघटनेची भाषा वापरताना आढळते. आजच्या समीक्षेला ही जाण

आलेली आहे की एखादी ललित कृती आपणांसमोर येते तेव्हा ती सजीव नसते. ती समीक्षा कला नसून केवळ कारागिरी असते. तेव्हा तिची संघटना ही अनन्यसाधारण नसून साधारण असते. तिचा फॉर्म्युला म्हणता येतो. परंतू खऱ्याखुऱ्या कृतींबाबत हे शक्य नसते. आजच्या समीक्षेला ही जाणीव आलेली आहे.

समीक्षेचे काम सोपे नाही हे आजच्या समीक्षेच्या लक्षात आलेले आहे. एका सजीव कलाकृतीच्या अनन्यासाधारण संघटनेचे विश्लेषण हे तिच्या एकत्वाला व सजीत्वाला धक्का न लावता करणे. ही गोष्ट अत्यंत कठिण आहे. त्यामुळे तिच्या प्रयत्नात अनेकदा तिला अपयश येत आहे. कलाकृतीच्या ज्या प्राणतत्वांचा आपण तपशील घेतो ते प्राणतत्वच आता सुटत चालेले आहे. ही चूक टाळायची कशी ?. असा प्रश्न ती स्वत:ला विचारीत आहे. समीक्षा कला नसून केवळ कारागिरी असते.

आज कोणत्याही कलाकृती संबंधी बोलताना त्या ललित कृतीतून व्यक्त झालेला अनुभव अशी भाषा न वापरता ती ललित कृती ती कविता हाच अनुभव ही भाषा वापरण्याकडे समीक्षेची प्रवृत्ती आहे. आजची कविता कवितेची समीक्षा ही प्रतिमांच्या भाषेत बोलते.

कथा, कादंबरी, नाटक यांसारख्या कथात्मक वाड;मय प्रकारात मोडणाऱ्या ललित कृतीचे परीक्षण करताना आता काही प्रश्न उपस्थित केले जात आहे. कथा, कादंबरीचे परीक्षण करताना म्हणूनच त्यांच्या कथात्मतेचे स्वरुप काय आहे. प्रत काय आहे, ते कथात्मतेच्या दृष्टीने कितपत अर्थपूर्ण आहे याचा विचार करण्याकडे समीक्षक अधिक प्रवृत्त होत आहे. पहिल्याच्या अंतर्गत संघनेपेक्षा दुसऱ्याची अंतर्गत संघटना कोणत्या बाबतीत वेगळी आहे. दुसरी ज्याप्रमाणे अनन्यसाधारण भासते त्याप्रमाणे पहिली का भासत नाही. पहिलीच्या विश्लेषणापेक्षा दुसरीचे विश्लेषण करणे अवघड का जाते. हे प्रश्न समीक्षा स्वाभाविकच उपस्थित करु इच्छिते. व त्याची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करते. म्हणजेच वर एके ठिकाणी स्पष्ट केल्याप्रमाणे कलाकृतीची 'कलाकृती' म्हणून परीक्षा करीत असताच तिच्या महात्मतेची परीक्षा करीत असते. या दोन परीक्षा वेगवेगळ्या नसून ती खरोखर एकच परीक्षा आहे. असेच ही नविन समीक्षा सुचवित आहे.

नाट्याभिव्यक्ती ही आशयानुरुप विविध रुपे घेत आहे. ही रुपे पारंपारिक नाट्यरुपांपेक्षा इतकी वेगळी होऊ पाहत आहेत की, अनेकांना ती विपरीत भासत आहेत. अस्वस्थ करीत आहेत. गोंधाळून टाकीत आहे. म्हणूनच नाटक म्हणजे काय? असा प्रश्न समीक्षक आता नव्याने स्वत:ला विचारीत आहेत. व त्याचे उत्तर नवनाट्यरुपे लक्षात घेऊन देण्याचा प्रयत्न करीत आहेत. या नवनाट्यरुपे परीक्षणही आता दिवसेंदिवस अवघड बनत आहे. आत्तापर्यंत नाट्यपरीक्षण ही पद्धत आपल्या पदरात जे टाकीत होती. ते म्हणजे नाट्यपरीक्षण नाही. हे आता उमजले आहे. मराठी नाट्यसमीक्षेने नविन नाट्य लेखनाचे आव्हान पुरेसे स्वीकारलेले आज तरी दिसत नाही. या नाट्यलेखनाने निर्माण केलेल्या प्रश्नांचा तिला निटसा अंदाज आलेला आहे. असेही वाटत नाही. परंतु एवढे खरे की आत्तापर्यंतच्या सरधोपट नाट्यसमीक्षापद्धतीवरचा तिचा विश्वास उडत चाललेला आहे. नाट्यसमीक्षा ही कथासमीक्षेपेक्षा जरी वेगळी असली तरी तिने कोणती पथ्ये पाळली पाहिजेत. कोणत्या दिशेने पाऊले टाकली पाहिजेत कोणत्या गोष्टींवर लक्ष केंद्रित केले पाहिजे हे प्रश्न तिला उपस्थित करावेसे वाटतात. नाट्य मग ते कोणत्याही रुपांमध्ये अवतरो आपल्या डोळ्यांदेखत उमलत असते. किंवा आपण असे म्हणू एका नाट्य बीजातून आपल्या डोळ्यापुढे एक नाट्यवृक्ष हळूहळू उभा राहत असतो. प्रत्येक नाटकाचे हे मूळ नाट्यबीज ओळखणे त्याची प्रकृती आजमावणे व त्या प्रकृतीनुसार

ते स्वाभाविकपणे अंकुरित होते की नाही हे पाहणे यामध्ये नाट्य समीक्षेने रस घेतला पहिजे. हे बीज कितपत अर्थगर्भ आहे ते कोणत्या योग्यतेचे आहे. त्याची नाट्याभिव्यक्ती कशी झाली आहे ती त्याला न्याय देणारी आहे काय? त्याची अर्थवत्ता ती प्रकट करु शकली आहे की नाही. याची दखल नाट्यसमीक्षकाने घेतली पाहिजे.

यावरुन असे स्पष्ट होते की, समीक्षेने काही गोष्टींची दखल घेणे डोळसपणे कलाकृतीचे, नाटकाचे समीक्षण केले तरच ती समीक्षा योग्य ठरते हे स्पष्ट होते. वा. ल. कुलकर्णी आपली समीक्षेची भूमिका स्पष्ट करताना सतत समीक्षकाला सावधानतेचा इशारा देतात.

वाड;मयेतिहास हा वाड;मयसमीक्षेचाच एक भाग. वाड;मयाच्या निर्मिती प्रक्रियेची समज जसजशी प्रगल्भ होत गेली तस तसे वाड;मयेतिहासाचे लेखनही अवघड गोष्ट आहे. याची जाणीव वाढली. विशिष्ट कालखंडातील वाड;मय म्हणजे वाड;मयाची लावलेली व्यवस्था होय.

वाड;मयाची व्यवस्था लावीत असताना कोणत्याही लेखनावर अन्याय होऊ न देणे ही गोष्ट कठिणच आहे. एकाच वेळी विविध वाड;मयप्रकारातून अवतरणारे लेखन एकमेकांवर परिणाम करत असते. परंतु वाड;मयेतिहासलेखक वाड;मयेतिहास लिहिताना या सर्व लेखनाची एकदम दखल घेत नाही. वाड;मयेतिहास अभ्यासक लेखनाची दखल वाड;मय प्रकाराने घेतो. हे करणे बरोबर आहे काय? अशाने एका कालखंडातील वाड;मय व्यापाराचे सम्यक चित्र रेखाटले जाणे शक्य आहे काय? वाड;मय हे कलानिष्ट की व्यक्तिनिष्ट? हा आणखी एक प्रश्न निर्माण होत आहे. वाड;मयेतिहास हा वर्णनात्मक असावा? की मूल्यमापनात्मक असावा. तो लिहिताना कालखंड पाडायचे ते कोणत्या तत्वानुसार पाडावेत. त्यांना नावे द्यावीत ती कोणत्या तत्वांनुसार द्यावीत असे लहान मोठे तात्विक व तांत्रिक प्रश्न उभे राहतात. त्यामुळे वाड;मयेतिहासलेखन ही एक तारेवरील कसरत आहे. तो एक शतावधानी अवघड खेळ आहे.

वा. ल. कुलकर्णी यांनी 'मराठी' वाड;मयविचार कोणत्या दिशेने जात आहे याविषयी विचार मांडताना लिहितात.

वा. ल. कुलकर्णी यांच्या समीक्षेतील सर्व भूमिकांवरुन असे सिद्ध होते की, वाड;मयीन शोध हा अखंडपणे चालू राहतो. समीक्षेचा शोध हा अनंत आहे. या समीक्षेच्या शोधाला अंत नाही. समीक्षकाने प्रथम सखोलपणे अभ्यास केला पाहिजे. डोळसपणे कलाकृतीचे परिशीलन केले पाहिजे. 'साहित्यसमीक्षा' ही 'शास्त्र' नाही. समीक्षेचा शोध घेताना त्या ललितकृतीच्या अंतरंगात आपल्याला विहार करता आला पाहिजे. आणि त्यातील संवेदनाची जाणीव वाचकांना करुन दिली पाहिजे. ललितकृतीतील वातावरण अनुभविले पाहिजे आणि नंतर निष्कर्ष दिले पाहिजेत. हीच समीक्षेची उत्तम पद्धत आहे.

समीक्षकाने 'समीक्षा' करत असताना आपल्या मार्गातील धोके ओळखून सावधता बाळगली पाहिजे. समीक्षकाने आपली पावले योग्यच मार्गावर टाकली पाहिजेत. समीक्षक हा नम्र असावा. असे वा. ल. कुलकर्णी सांगतात.

वा. ल. नी अनेक समीक्षणपर पुस्तके लिहिली. समीक्षेविषयीची 'भूमिका' मांडताना त्या मांडलेल्या भूमिकेप्रमाणे स्वत:लाच प्रश्न विचारतात. मला तरी ती भूमिका योग्य प्रकारे कितपत जमलेली आहे.

वा. ल. कुलकर्णी यांची समीक्षाविषयी भूमिका अभ्यासल्यानंतर त्यांनी वारंवार उदाहरणे, स्वत:चे

अनुभव लिहिलेले आहेत. यावरुन समीक्षकाकडे एक उत्तम गुण असावा तो म्हणजे आपल्या विचारांचे समर्थन करण्याची पात्रता समीक्षकाकडे असली पाहिजे. ती पात्रता कुलकर्णी यांच्याकडे दिसून येते. त्यांच्या सर्व पुस्तकांतून त्यांची समीक्षा लिहण्याची पद्धत ही त्यांच्या समीक्षेच्या भूमिकेला धरूनच आहे असे मला म्हणावेसे वाटते.

वा. ल. कुलकर्णी यांच्या समीक्षेवरुन त्यांच्या अभ्यासाची खोली लक्षात येते.

वाङ्‌मयीन टीका करीत असताना समीक्षकाला कोण कोणते प्रश्न निर्माण होतात. समीक्षा ही वाटते तेवढी सोपी नाही. समीक्षा म्हणजे तारेवरील कसरत असे ते म्हणतात. समीक्षकाला समीक्षा करत असताना निर्माण झालेल्या समस्येवर मात करता आली नाही तर तो समीक्षक म्हणवून घेण्यासाठी अपात्र ठरतो. आणि कलाकृतीला योग्य न्याय मिळू शकत नाही. म्हणजे ती कलाकृती लिहिणाऱ्यावर अन्याय होऊ शकतो. याची खबरदारी समीक्षकाने घेतली पाहिजे.

वा. ल. कुलकर्णी यांच्या एकूण समीक्षेवरुन असा निष्कर्ष काढावासा वाटतो की, त्यांनो समीक्षेविषयी योग्य भूमिका सांगून ते एक उत्तम समीक्षक आहेत हे त्यांच्या समीक्षेवरुन सिद्ध करुन दाखविलेले आहे. समीक्षेच्या भूमिकेप्रमाणेच त्यांनी स्वत:ही समीक्षा केलेली आहे.

******

## संदर्भ टीपा


१) वा. ल. कुलकर्णी, साहित्य शोध आणि बोध, ग. रा. भटकळ, १९६७/१८८९.
३४ सी, ताडदेव रोड, मुंबई ३४, पहिली आवृत्ती, पृष्ठ क्रमांक - ६

२) वाड;मयीन मते आणि मतभेद

३) तत्रैव पृष्ठ क्रमांक : ११५

४) वा. ल. कुलकर्णी, साहित्य स्वरुप आणि समीक्षा, रामदास भटकळ, १९७५.
३५, सी ताडदेव रोड, मुंबई ४०० ०३४. पहिली आवृत्ती पृष्ठ क्रमांक : १७०.

५) तत्रैव पृष्ठ क्रमांक : १७१

६) तत्रैव पृष्ठ क्रमांक : १७२

७) तत्रैव पृष्ठ क्रमांक : १७६

८) तत्रैव पृष्ठ क्रमांक : १६४

९) तत्रैव पृष्ठ क्रमांक : १५५

१०) तत्रैव पृष्ठ क्रमांक : १५६

११) तत्रैव पृष्ठ क्रमांक : १५६

१२) तत्रैव पृष्ठ क्रमांक : १५७

१३) तत्रैव पृष्ठ क्रमांक : १५७

१४) तत्रैव पृष्ठ क्रमांक : १८६

१५) तत्रैव पृष्ठ क्रमांक : १९९


******